# महिलांच्या अटकेविषयीचे नियम.

## १- महिलांकडे तपास करून जबाब नोंदविणे -

. स्त्रिाया आणि अज्ञान मुले (१५ वर्षा पेक्षा कमी वयाची)यांना पोलीस जबाब देण्याकरीता पोलीस स्टेशन मध्ये बोलविण्यात येवु नये. त्यांचे राहते घरी जाऊन जबाब घ्यावयास पाहिजे.कोणत्याही १५ वर्षाखालील किंवा ६५ वर्षावरील वयाच्या पुरुषाला किंवा एखादया स्त्रीला किंवा मानसिकदृष्टया किंवा शारीरीक दृष्टया विकलांग व्यक्तिला ,असा पुरुष किंवा स्त्री ज्या स्थळी राहात असेल त्याहुन अन्य कोणत्याही स्थळी हजर राहण्यास सांगितले जाणार नाही.

`.

**फौ.दं.प्र.सं. कलम १६०(२).** व ***Kasturilal vs The State of Uttarpradesh A.R.I. 1965 S.C.1039***

## २महिला संशियताची झडती-

जेव्हा केव्हा एखादया स्त्रीची झडती घेणे जरूरीचे असेल तेव्हा ,सभ्यता काअेकोरपणे सांभाळुन झडती घेतली जाईल.दुसरी स्त्री झडती घेईल .

## ३-आरोपी महिलेस अटक--

- अपवादात्मक परिस्थितीखेरीज कोणत्याही महिलेस सुर्यास्तानंतर किंवा सुर्यास्तापुर्वी अटक करता येणार नाही. तथापि, अपवादात्तक परिस्थितीत, महिला पोलीस अधिकारी लेखी निवेदन देवून व स्थानीक अधिकारीता असलेल्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याची पुर्व परवानगी घेतल्याखेरीज अटक करता येणार नाही. स्त्री याचा अर्थ - भा.द.वि.कलम १० प्रमाणे कोणत्याही वयाची स्त्री असा आहे.

**फौ.दं.प्र.सं.कलम४६(४) व Mrs bharti s khandar vs Maruti Govind Jadhav and othrs-**

-

- परंतु  जेव्हा एखादया महिलेस अटक करावयाची असेल तेव्हा विरुध्द परिस्थिती दिसुन येत नसेल तर, अटकेबाबत केलेल्या सुचनेवरुन स्वाधीन होण्याची तिची शरणागती ही, अटक असल्याचे गृहीत धरण्यात येईल. आणि अन्यप्रकारे तसे आवश्यक नसेल तर , किंवा पोलीस अधिकारी ही महिला नसेल तर, पोलीस अधिकारी, महिलेस अटक करण्यासाठी तिला स्पर्श करणार नाही.

**फौ.दं.प्र.सं.कलम ४६(१)**

- अटक आरोपीस पकडताच त्याला अटकेची कारणे सांगावीत. तसे त्याला जामीन मागण्याचा अधिकार आहे, याची कल्पना दयावी. अटक आरोपीच्या कायदेशीर अधिकारांची माहिती देणारे माहितीपत्रक आरोपीला वाचुन दाखवावे. एक प्रत लॉकअप मध्ये लावावी. हिंदी-इंग्रजी-मराठीत प्रत तयार करावी व ती आरोपींना वाचुन दाखवावी.
- अटक आरोपीची माहिती कायदा मदत केंद्राला सत्वर दयावी. मग त्यांनी कायद्याची मदत अटक आरोपीस दयावी.
- आरोपीला अटक होताच पोलीसांनी त्याचेकडून त्याचे नातेवाईक अगर मित्र यांचा पत्ता घ्यावा आणि त्यांना अटकेची माहिती त्वरीत कळवावी.
- अटक आरोपीस मॅजीस्ट्रेटपुढे हजर करताच मॅजीस्ट्रेटने त्याला पोलीसांकडून मारहाण - जाच झाला आहे        काय? याची चौकशी करावी. आणि त्याला डॉक्टरांकडून शारीरीक तपासणी करुन घेण्याचा क्रि.प्रो.कलम ५४ प्रमाणे अधिकारच आहे याची जाणीव करुन दयावी.

***Sheela Barse vs The State of Maharashtra 1983 2  s.c.c. 96***

- **प्रसुती झालेल्या महिलांची अटक :-**

काही प्रसंगी नुकत्याच प्रसुती झालेल्या महिलांना अटक केली जाते. त्यांचे लहान मुल  त्यांच्या कुशीत असते. तेव्हा त्यांना अटकेनंरत मॅजीस्ट्रेट पुढे अटक करणे शक्य नसते. कारण त्यांचे प्रकृतीला धोका संभवतो. त्यावेळी अशा महिलांना त्यांचे नातेवाईकांकडे अगर जवळच्या दवाखान्यात राहावयास सांगावे, आणि मग संबंधित मॅजीस्ट्रेट कडून क्रि.प्रो.को.कलम ५७ नुसार २४ तासानंतरची रिमांड त्याच घरात अगर दवाखान्यात राहण्यासंबंधी परवानगी घ्यावी. हाच नियम जे अटक आरोपी मॅजीस्ट्रेट पुढे हजर करण्याकरीता प्रवास करण्यास असमर्थ असतील त्यांचे बाबतीत पण वापरता येते.  म्हणजेच अशा स्त्रीया, आजारी व्यक्ती यांना समक्ष कोर्टापुढे हजर करण्याची आवश्यकता नसते. अशी स्पष्ट तरतुद मुंबई हायकोर्टाचे क्रि.मॅन्युअल प्रकरण १, नियम नं.२ मध्ये केली आहे.                    -

**मुंबई हायकोर्टाचे क्रि.मॅन्युअल प्रकरण १, नियम नं.२**

- आजारी आरोपी महिलेला कोणत्याही परिस्थितीत बेडया घालू नये.

**मुंबई पोलीस मॅन्युअल भाग - ३, नियम ४११**

-

- जर फौ.दं.प्र.सं. कलम ४६(१) व फौ.दं.प्र.सं.कलम४६(४) पध्दतीने अटक केली गेली नाही, तर तीया केस लॉ प्रमाणे ती अटक ठरु शकत नाही. अशी अटक अवैध व निरर्थक ठरते.

**Roshan Bi Vs The State of Tamilnadu, 1984**

## ४ महिला आरोपीची चौकशी-

महिला आरोपीची चौकशी महिला पोलीस अधिकाऱ्यांचे किंवा महिला अंमलदाराच्या उपस्थितीतच करावी.

***Sheela Barse vs The State of Maharashtra 1983 2 s.c.c. 96***

## ५ महिला आरोपीची कोठडी

महिला संशयीत आरोपींना चांगल्या वस्तीत लॉकअप मध्ये ठेवावे. आणि त्यांचेवर महिला पोलीस नेमावेत. ज्याठिकाणी पुरुष आरोपी लॉकअप मध्ये असतात तेथेच महिलांना ठेवू नये. एकच लॉक अप असेल तर वेगळया रुम मध्ये ठेवण्यात यावे.

महिला अंमलदारच पहारेकेरी म्हणुन थांबतील

***Sheela Barse vs The State of Maharashtra 1983 2 s.c.c. 96***

## ६ महिला आरोपिताची वैदयकिय तपासणी

**कलम ५३(२) -** जेव्हा केव्हा एखादया स्त्रीची शारीरीक तपासणी करावयाची असेल तेव्हा ती तपासणी केवळ नोंदीव वैद्यकीय व्यवसायीक स्त्री करवी किंवा तिच्या देखरेखीखालीच केली जाईल.तपासणी मध्ये

न्यायसहायक विज्ञान यांना पाठविणेकामी वैदयकिय नमुने गोळा करणे .आधुनिक आणि शास्त्रीय तंत्रादवारे तसेच विशिष्ट प्रकरणात नोंदणीकृत वैदयकिय व्यायसिकाला आवश्यक वाटेल अशा इतर चाचण्यांचा देखिल समावेश होतो.

**फौ.दं.प्र.सं . कलम ५३(२)**

## ७ महिला आरोपिला कायदेशिर मदत

अटक आरोपी महिलेची माहिती कायदा मदत केंद्राला सत्वर दयावी. मग त्यांनी कायद्याची मदत अटक महिला आरोपीस दयावी.

***Sheela Barse vs The State of Maharashtra 1983 2 s.c.c. 96***

# ८ केस लॉ -

### १.***Sheela Barse vs The State of Maharashtra 1983 2 s.c.c. 96***

या केसमध्ये सुप्रीम कोर्टाने अटक आरोपींना मारहाणीपासून, त्रासापासून आणि क्वचीत प्रसंगी कोठडीमधील मृत्युपासून संरक्षण दिले आहे. मा.न्यायमुर्ती पी.एन.भगवती यांनी अत्यंत मोलाच्या आणि व्यवहारी मार्गदर्शक सुचना केल्या आहेत त्या अशा -

१. महिला संशयीत आरोपींना चांगल्या वस्तीत लॉकअप मध्ये ठेवावे. आणि त्यांचेवर महिला पोलीस नेमावेत. ज्याठिकाणी पुरुष आरोपी लॉकअप मध्ये असतात तेथेच महिलांना ठेवू नये.
२. महिला आरोपीची चौकशी महिला पोलीस अधिकाऱ्यांचे उपस्थितीतच करावी.
३. अटक आरोपीस पकडताच त्याला अटकेची कारणे सांगावीत. तसे त्याला जामीन मागण्याचा अधिकार आहे, याची कल्पना दयावी. अटक आरोपीच्या कायदेशीर अधिकारांची माहिती देणारे माहितीपत्रक आरोपीला वाचुन दाखवावे. एक प्रत लॉकअप मध्ये लावावी. हिंदी-इंग्रजी-मराठीत प्रत तयार करावी व ती आरोपींना वाचुन दाखवावी.
४. अटक आरोपीची माहिती कायदा मदत केंद्राला सत्वर दयावी. मग त्यांनी कायद्याची मदत अटक आरोपीस दयावी.

५. मुंबई शहरात सीटी सेशन्स जज्जांनी अचानकपणे वरचेवर पोलीस लॉकअप तपासावेत आणि तेथील कैदयांची म्हणणे ऐकुन घ्यावीत. योग्य त्या सुवीधा दिल्या जात आहेत किंवा नाहीत, याची तपासणी करावी. तसेच कायदेशीर तरतुदी आणि या कोर्टाने दिलेल्या सुचना पाळल्या जात आहेत किंवा नाही, याची पाहणी करावी. काही दोषी आढळल्यास पोलीस आयुक्तांकडे अहवाल पाठवावा आणि आवश्यक वाटल्यास गृह खात्याकडे, पण अहवाल पाठवावा. तसेच उच्च न्यायालयाचे लक्ष वेधून घ्यावे.
६. आरोपीला अटक होताच पोलीसांनी त्याचेकडून त्याचे नातेवाईक अगर मित्र यांचा पत्ता घ्यावा आणि त्यांना अटकेची माहिती त्वरीत कळवावी.
७. अटक आरोपीस मॅजीस्ट्रेटपुढे हजर करताच मॅजीस्ट्रेटने त्याला पोलीसांकडून मारहाण - जाच झाला आहे काय? याची चौकशी करावी. आणि त्याला डॉक्टरांकडून शारीरीक तपासणी करुन घेण्याचा क्रि.प्रो.कलम ५४ प्रमाणे अधिकारच आहे याची जाणीव करुन दयावी.

### २. *Kasturilal vs The State of Uttarpradesh A.R.I. 1965 S.C.1039*

स्त्रिाया आणि अज्ञान मुले १५ वर्षाखाली यांना पोलीस जबाब देण्याकरीता पोलीस स्टेशन मध्ये बोलविण्यास क्रि.प्रो.कलम १६० प्रमाणे मनाई आहे. त्यांचे राहते घरी जाऊन जबाब घ्यावयास पाहिजे.

### ३. *The State of Maharashtra vs Christian Community Welfare India & another (AIR) 2004 S.C.7*

अटक करणाऱ्या संस्थेने अटक करतेवेळी महिला अंमलदार उपस्थित करण्याबाबत सर्वोतपरी प्रयत्न करणे आवश्यक आहे. परंतु महिला अंमलदार ही उपलब्ध नसेल किंवा महिला आरोपीस अटक करण्यामध्ये उशीर केल्यास त्याचा तपासावर परिणाम होण्याची शक्यता असेल. तर अटक करणाऱ्या अधिकाऱ्यांने अटकेची कारणे नमुद करुन कायदेशीर कारणांसाठी दिवसा किंवा रात्रीच्या कोणत्याही वेळेस महिला अंमददाराच्या अनुपस्थितीत महिला आरोपीस अटक करु शकतो.

### ४ **Mrs bharti s khandar vs Maruti Govind Jadhav and othrs-**

न्यायदंडाधिकाऱ्यांच्या परवानगीशिवाय सुर्यास्तानंतर स्त्रीस अटक करणे हे बेकायदेशीर आहे.

कलम ४६(४) प्रमाणेच - अपवादात्मक परिस्थितीखेरीज कोणत्याही महिलेस सुर्यास्तानंतर किंवा सुर्यास्तापुर्वी अटक करता येणार नाही. तथापि, अपवादात्तक परिस्थितीत, महिला पोलीस अधिकारी लेखी निवेदन देवून व स्थानीक अधिकारीता असलेल्या प्रथम वर्ग न्यायदंडाधिकाऱ्याची पुर्व परवानगी घेतल्याखेरीज अटक करता येणार नाही.